मराठी - हिंदी साप्ताहिक

वाशी समाचार

प्रशासन व लोकप्रतिनिधींवर अंकुश ठेवणारे एकमात्र समाचार पत्र

संपादक : सुनील धों. तावडे (मो. 9004249262) Posting day every Wednesday, Vashi, Navi Mumbai RNI-MAHBIL/2022/82594 Post R.No. NMB/200/2024-26

ठाणे - नवी मुंबई • मंगळवार, दि. 10 फेब्रुवारी ते 16 फेब्रुवारी 2026 | • वर्ष 4 थे | • अंक क्र. 38 | • किमत 2 रुपये | • पृष्ठे : 8

THE PARK Navi Mumbai



नवी मुंबईचा विकास, हाच आमचा ध्यास.



नवी मुंबई महानगरपालिकेच्या
महापौर व उपमहापौर पदी
निवड झाल्या बद्दल हार्दिक
अभिनंदन !

महापौर
मा. सौ. सुजाता सुरज पाटील

उपमहापौर
मा. श्री. दशरथ सिताराम भगत

श्री. निशांत भगत (भाऊ)
नगरसेवक, प्रभाग क्र. १८

सौ. प्रिती संदीप भगत
नगरसेविका, प्रभाग क्र. १८

श्रीमती फशीबाई करसन भगत
मा. नगरसेविका

सौ. वैजयंती दशरथ भगत
मा. नगरसेविका

सौ. रुपाली निशांत भगत
मा. नगरसेविका

शुभेच्छुक : संदिप करसन भगत, समाजसेवक

संपादकीय

घातक पाणी

इंदूरमध्ये दूषित पाण्यामुळे २७ जणांचा मृत्यू झाला आहे. जलवाहिन्यांमार्फत दूषित पाण्याचा पुरवठा आणि त्यामुळे महू येथील कविळीची साथ याचा फटका नागरिकांना बसत आहे. इंदूरनंतर महूतील घटना, प्रशासन यंत्रणा किती बेपर्वाईपणाची आहे आणि किती नागरिकांच्या आरोग्याशी खेळते आहे हे सिद्ध होते.

मध्य प्रदेशातील इंदूर शहरातील जलसंकट आणि दूषित पाण्याची चर्चा सध्या देशभर आहे. इंदूरमध्ये दूषित पाण्यामुळे २७ जणांचा मृत्यू झाला आहे. जलजन्य आजारांमुळे अनेक रुग्ण विशेषतः लहान मुले रुग्णालयात दाखल आहेत. ज्या शहराला स्वच्छतेबद्दल सातत्याने पुरस्कार मिळत आले आहेत, त्या राज्यातील लहान मुले दूषित पाण्यामुळे आजाग्रस्त आहेत, हे विदारक सत्य पाहायला मिळत आहे. महूमध्ये २२ जणांमध्ये कविळीची लक्षणे आढळून आली. वास्तविक कावीळ हा काही असाध्य आजार नाही. पण इंदूरच्या जलवाहिन्यांमध्ये असलेल्या प्रदूषणामुळे भयानक रोगाने पुन्हा डोकेवर काढले आहे. इंदूरमध्ये दूषित पाण्यामुळे काहीजण मृत्यूमुखी पडल्याबर महूतील घटना इंदूरची प्रशासन यंत्रणा किती बेपर्वाईपणाची आहे आणि किती नागरिकांच्या आरोग्याशी खेळते आहे हे सिद्ध होते.

महु येथे तर एक विहीर दूषित पाण्याने भरलेली आढळली. २४ हून अधिक नागरिक येथे आजारी पडले आणि आता या भागातील प्रशासनाने खबरदारीचे उपाय हाती घेतले आहेत. इंदूरच्या घटनेनंतर महु येथील घटना प्रशासनाला खडबडून जाग आणणारी ठरली आहे. पण यामुळे नागरिकांना पुरेसे स्वच्छ पाणी आणि पिण्यासाठी चांगले पाणी मिळेल का असा प्रश्न उभा राहिला आहे. इंदूर की महू असो की भारतातील कोणतेही लहान तालुकास्तरीय गाव असो, येथील नागरिकांना एका व्यापक सत्याला सामोरे जावे लागत आहे. ते म्हणजे स्वच्छ पाण्यापर्यंत पोहोच आणि सुरक्षा हे एकमेकांना पूरक असले पाहिजेत. पण, नेमके तेच त्यांना मिळत नाही. केवळ नागरिकांना पाणी देण्यामुळे आरोग्यावर झालेले परिणाम सुधारणार नाहीत तर त्यासाठी स्वच्छ पाणी मिळणे तितकेच गरजेचे आहे. भारतात जे जलजन्य आजारांच्या साथी येत आहेत. त्यांना दुर्दैवी परंतु पृथक स्थानिक स्वराज्य संस्थांची ढिलाई म्हणून पाहिले जाते. स्थानिक अधिकाऱ्यांचे हे अपयश तर आहेच पण जुनाट पाइपलाइन आणि क्वचित गंजलेल्या पाइपमधून पाणीपुरवठा होत राहणे हेही या साथींचे कारण आहेच. भागीरथपुरा येथील दुर्घटना हे दर्शवते, की हा एक अपघात नव्हता तर संभाव्य दृश्य परिणाम होता ज्यात सरकारी कारभाराचे मॉडेल ज्यात केवळ दिखाऊ स्वच्छता आणि आकडेवारीने मूलभूत सार्वजनिक आरोग्य आणि लोकांना स्वच्छ पेयजल देण्याचे वचन पाळले गेले नाही. इंदूर शहरातील शोकांतिकेने एक प्रश्न निर्माण केला आहे तो म्हणजे नळातून जर सांडपाणी येत असेल तर शहराच्या स्वच्छतेला काय अर्थ?.

सरकारने टाकलेल्या जलवाहिन्यांमार्फत दूषित पाण्याचा पुरवठा आणि त्यामुळे महू येथील कविळीची साथ याचा फटका नागरिकांना बसत आहे. तसेच इंदूरमध्ये अतिसाराची साथ आली आणि त्यात काही नागरिकांचा बळी गेला आहे. याचा अर्थ सरळ आहे. नगरपालिका प्रशासनाने यात कुचराई केली आहे. जलवाहिन्या गंजलेल्या आहेत आणि भगीरथपुरा येथील एक जलवाहिनी तर स्वच्छतागृहाच्या खाली दबलेली होती. महूमध्ये पट्टी बाजार आणि चंदन नगर येथे गळक्या पाइपलाइनमुळे कविळीची साथ पसरली, महुमध्ये पाणीपुरवठा आणि स्वच्छतेची जबाबदारी कटक मंडळ (कॅन्टोनमेंट बोर्ड)ची आहे. रहिवाशांना उकळून पाणी पिण्याचा सल्ला देण्यात आला. पण 'बैल गेला आणि झोपा केला' अशी ही स्थिती आहे.

कॅगने २०१९ च्या अहवालात ८.९५ लाख रहिवाशांना दूषित पाण्याचा पुरवठा केल्याचा ठपका ठेवला होता. तसेच पाण्याच्या नमुन्यांचे सर्वेक्षण न केल्याचा आरोपही करण्यात आला होता. हे म्हणजे नागरिकांच्या आरोग्याशी अक्षम्य छेडछाड आहे असे नमूद करावे लागेल आणि त्याबाबत कुणालाही खंत नाही किंवा खेदही नाही ही बाब जास्त दुःखदायक आहे. अधिकाऱ्यांनी पाण्यामुळे होणाऱ्या आजाराची ५.४५ लाख प्रकरणे नोंदवली. पण त्यातही गंभीर बाब अशी की कॅगने आपल्या अहवालात पाण्याच्या चाचण्यांचा अभाव नोंदला आहे. त्यामुळे इंदूर किंवा महू किंवा मध्य प्रदेशात कुठेच पाणी दूषित आहे की नाही याची काहीच खातरजमा करता येत नाही.

आता हा दूषित पाण्याचा पुरवठा हा निश्चितच मध्यप्रदेशातील राजकीय पक्षांसाठी वादाचा मुद्दा बनला आहे. या मुद्द्यामुळे व्यापक पाण्याचा पेच तर ऐरणीवर आला आहेच पण काँग्रेस आणि भाजप यांच्यात जोरदार वाद रंगला आहे. काँग्रेसने या मुद्द्यावर व्यापक जनमोर्चे आयोजित केले तर भाजपने त्याला जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. वास्तव हे आहे की पाणी हा राजकीय मुद्दा आहेच. कारण पाण्यावरून लढाया होतील असे भाकीत वर्तवले होते. कोणतेही सरकार मग ते कोणत्याही पक्षाचे असो, ते इतक्या अफाट लोकसंख्येला पुरेसे आणि स्वच्छ पाणी पुरवू शकत नाही. पण याचा अर्थ असा नव्हे की इंदूर नगरपालिकेने केले ते योग्य केले. पण सरकारची क्षमता इतक्या लोकसंख्येला सुरक्षित पाणी पुरवण्याची नाही. यात राजकारण आणणे चुकीचे नव्हे तर निषेधार्ह आहे.



गणेश नगर आगीत होरपळलेल्या कुटुंबांना आमदार प्रशांत ठाकूर यांची तातडीची मदत

■ पनवेल (प्रतिनिधी)

नवीन पनवेल सेक्टर १-एस येथील गणेश नगर झोपडपट्टी परिसरात मंगळवारी दुपारी अचानक आग लागून अनेक घरे जळून खाक झाली. या आगीत रहिवाशांचे मोठे नुकसान झाले असून, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. या घटनेची तातडीने दखल घेत आमदार प्रशांत ठाकूर यांनी आगग्रस्त सात कुटुंबांना आर्थिक मदत जाहीर केली आहे.

मंगळवारी दुपारी लागलेल्या आगीत दोन लहान व दोन मोठ्या गॅस सिलिंडरचा स्फोट झाला. मात्र सहा सिलिंडर वेळेत सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आल्याने मोठा अनर्थ टळला. अग्निशमन दलाने सुमारे दोन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवले. या दुर्घटनेत घरे जळून खाक झाल्याने कुटुंबांचे संसारोपयोगी साहित्य मोठ्या प्रमाणावर नष्ट झाले.

संवेदनशीलतेने मदतीचा हात पुढे करत आमदार प्रशांत ठाकूर यांनी आगग्रस्त सात कुटुंबांना आर्थिक सहाय्य दिले. पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी बुधवारी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली व त्यानंतर ही मदत सुपूर्द करण्यात आली.

यावेळी नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार, संतोष शेट्टी, नगरसेविका कविता चौतमोल, राजेश्री वावेकर आदी उपस्थित होते. या मदतीमुळे आगग्रस्त कुटुंबांना काहीसा दिलासा मिळाला असून, पुढील पुनर्वसनासाठी प्रशासनाकडून आवश्यक मदत देण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

अनधिकृत बांधकामांवर महापालिकेचा बुलडोझर



■ बेलापूर (वाशी समाचार)

नवी मुंबई महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागामार्फत मा. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार तसेच अतिरिक्त आयुक्त (2) डॉ. राहुल गेठे व उपआयुक्त (अतिक्रमण) डॉ. कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली बेलापूर विभागात अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

MRTP कायदा कलम 53(1)(अ) अन्वये रफिक काझी व इतर (घर क्र. 395, नमुंमपा शाळा क्र. 01 च्या दक्षिणेला, बेलापूर गाव, सेक्टर-20, सीबीडी बेलापूर) यांना नोटीस बजाविण्यात आली. तसेच MRTP कलम 54 अन्वये सलिम माजिद याकुब सय्यद (घर क्र. 0390, सेक्टर-20, बेलापूर गाव) आणि गणेश आर. तांडेल व इतर (घर क्र. 279/005, पोतदार शाळेजवळ, करावे गाव, सेक्टर-36) यांना नोटिसा देण्यात आल्या.

याशिवाय सेक्टर-15 येथील सनसिटी बिल्डिंग परिसरात उभारलेले अनधिकृत पावसाळी शेड संबंधितांनी स्वतःहून हटविणे अपेक्षित होते. मात्र ते न हटविल्याचे आढळून आल्याने बेलापूर विभाग कार्यालयामार्फत दिनांक 04 फेब्रुवारी 2026 रोजी तोडक कारवाई राबविण्यात आली. या मोहिमेत सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी प्रशांत नेरकर, सहाय्यक अभियंता आत्माराम काळे यांच्यासह इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

'कम्फर्ट'-'स्लीप वेल' डास अगरबत्तीवर महाराष्ट्रात बंदी

■ मुंबई (वाशी समाचार)

सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी महाराष्ट्र सरकारच्या कृषी विभागाने एक महत्त्वाचे आणि ठोस पाऊल उचलले आहे. राज्यभरात 'कम्फर्ट' आणि 'स्लीप वेल' या ब्रँड नावाने विकल्या जाणाऱ्या बेकायदेशीर डास प्रतिबंधक अगरबत्तींच्या विक्रीविरोधात तातडीने कठोर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यासंदर्भात राज्यातील सर्व कीटकनाशक निरीक्षकांना छापे टाकणे, बेकायदेशीर साठा जप्त करणे आणि दोषींवर खटले दाखल करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

ही कारवाई कीटकनाशक कायदा, १९६८ आणि कीटकनाशक नियम, १९७१ यांच्या अंमलबजावणीअंतर्गत करण्यात येत असून, या कायद्यांचे उल्लंघन करणाऱ्या किरकोळ विक्रेते, दुकानदार आणि वितरकांवर कठोर शिक्षा होऊ शकते, असा इशाराही सरकारने दिला आहे. घरगुती कीटकनाशकांचा सुरक्षित आणि जबाबदारीने वापर व्हावा यासाठी कार्यरत असलेल्या, मुंबईस्थित होम इन्सेक्ट कंट्रोल असोसिएशन (HICA) या ना-नफा संस्थेने महाराष्ट्र सरकारच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे. मागील काही महिन्यांपासून HICA प्रशासनाच्या सातत्यपूर्ण संपर्कात होती आणि मंजुरी नसलेली रसायने वापरून तयार करण्यात येणाऱ्या डास प्रतिबंधक अगरबत्तींबाबत वेळोवेळी संबंधित यंत्रणांना सतर्क करत होती. यापूर्वी आंध्र प्रदेशमध्ये 'स्लीप वेल' आणि मुंबईमध्ये 'कम्फर्ट' या डास प्रतिबंधक अगरबत्तींच्या नमुन्यांची प्रयोगशाळा तपासणी करण्यात आली होती. या तपासणीत त्यामध्ये मंजुरी नसलेली व बेकायदेशीर कीटकनाशके आढळून आली होती. त्यानंतर विविध राज्यांमध्ये या उत्पादनांबाबत चौकशी सुरू झाली आणि काही ठिकाणी कारवाईही करण्यात आली. मुंबईमध्ये अनेक ठिकाणी छापे टाकून 'कम्फर्ट' डास प्रतिबंधक अगरबत्तीवर बंदी घालण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर अवघ्या १५ दिवसांत महाराष्ट्र सरकारने ही कारवाई राज्यव्यापी स्तरावर वाढवली असून, 'कम्फर्ट' आणि 'स्लीप वेल' या दोन्ही उत्पादनांची विक्री थांबवण्यासाठी नवीन परिपत्रक जारी करण्यात आले आहे. महाराष्ट्राच्या कृषी संचालकांनी हे परिपत्रक राज्यातील सर्व विभागीय सहसंचालक आणि कीटकनाशक निरीक्षकांना पाठवले आहे. या परिपत्रकानुसार, संबंधित अधिकाऱ्यांना छापे टाकणे, बेकायदेशीर साठा जप्त करणे आणि केलेल्या सर्व कारवाईचा सविस्तर अहवाल कृषी आयुक्तालयाकडे सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच नोंदणी नसलेल्या कीटकनाशक उत्पादनांची विक्री, साठवणूक किंवा वितरण करणे हे पूर्णपणे बेकायदेशीर असून, त्यासाठी कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. HICA ने सर्व किरकोळ विक्रेते आणि वितरकांना लागू नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे. तसेच ग्राहकांनी डास प्रतिबंधक उत्पादने खरेदी करताना फक्त वैध CIBRC (Central Insecticides Board & Registration Committee) नोंदणी क्रमांक असलेलीच उत्पादने खरेदी करावीत, असे आवर्जून सांगितले.

मराठी - हिंदी साप्ताहिक

वाशी समाचार

प्रशासन व लोकप्रतिनिधींवर अंकुश ठेवणारे एकमात्र समाचार पत्र

संपादक : सुनील धों. तावडे (मो. 9004249262) Posting day every Wednesday, Vashi, Navi Mumbai RNI-MAHBIL/2022/82594 Post R.No. NMB/200/2024-26

ठाणे - नवी मुंबई • मंगळवार, दि. 10 फेब्रुवारी ते 16 फेब्रुवारी 2026 | • वर्ष 4 थे | • अंक क्र. 38 | • किमत 2 रुपये | • पृष्ठे : 8

THE PARK Navi Mumbai

नवी मुंबईत लोककेंद्रित प्रशासनाची मजबूत पायाभरणी

पदभार स्वीकारताच उपमहापौर दशरथ भगत यांचा थेट जनसंवाद

■ नवी मुंबई (सुनील तावडे)

नवी मुंबई महानगरपालिकेच्या उपमहापौरपदाचा पदभार स्वीकारताच उपमहापौर दशरथ भगत यांनी पहिल्याच दिवशी नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देत कार्यपद्धतीची ठोस सुरुवात केली. दिनांक ६ फेब्रुवारी रोजी, राज्याचे लोकाभिमुख मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच वनमंत्री व लोकनेते गणेश नाईक यांच्या नेतृत्वाखाली मिळालेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार, नागरिक-केंद्रित आणि परिणामकारक प्रशासनाचा संकल्प त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून अधोरेखित केला. यावेळी माजी महापौर तथा नगरसेवक सागर नाईक यांची प्रमुख उपस्थिती होती.

पदभार स्वीकारताच उपमहापौर दशरथ भगत यांनी शहराच्या विविध भागांतून



आलेल्या नागरिकांशी थेट संवाद साधत त्यांच्या समस्या, तक्रारी तसेच नागरी सुविधांबाबतच्या अपेक्षा सविस्तरपणे जाणून घेतल्या. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित प्रश्नांना संवेदनशीलतेने समजून घेत, त्या समस्यांवर तातडीने व प्रभावी उपाययोजना व्हाव्यात यासाठी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना व आवश्यक मार्गदर्शन देण्यात आले. यावेळी बोलताना उपमहापौर दशरथ भगत म्हणाले, "लोकप्रतिनिधी म्हणून जनतेशी थेट संपर्क, पारदर्शक निर्णयप्रक्रिया आणि वेळेत समस्या निवारण हीच माझ्या कार्यपद्धतीची मुख्य सूत्रे असतील." नवी मुंबई शहराच्या सर्वांगीण विकासासाठी, तसेच नागरिकांना अधिक सक्षम, सुरक्षित आणि सोयीस्कर नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रामाणिकपणे व जबाबदारीने कार्य करण्याचा ठाम संकल्प त्यांनी व्यक्त केला. नागरिकांच्या विश्वासाला पात्र ठरेल असे लोकाभिमुख, उत्तरदायी आणि गतिमान प्रशासन देण्याचा हा प्रभावी प्रारंभ असून, पुढील काळातही जनतेच्या सहभागातून नवी मुंबईच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील, असा विश्वास उपमहापौरांनी व्यक्त केला.

तुर्भे मध्ये कचऱ्यापासून विजनिर्मिती प्रकल्पाला मिळाली मंजुरी

आमदार मंदाताई म्हात्रे यांच्या पुढाकारातून नवी ऊर्जा क्रांती

■ नवी मुंबई (वाशी समाचार) :

स्मार्ट सिटी नवी मुंबईची प्रत्यक्ष झलक दाखवण्यासाठी बेलापूर विधानसभेच्या आमदार मंदाताई म्हात्रे यांनी सातत्यपूर्ण प्रयत्न केले आहेत आणि अखेर त्यांना मोठे यश मिळाले आहे. तुर्भे येथे 'कचऱ्यापासून विज निर्मिती प्रकल्प' (Waste-to-Energy Plant) मंजूर झाला असून, हा प्रकल्प लवकरच कार्यान्वित होणार आहे. नवी मुंबईतील झपाट्याने वाढणारी लोकसंख्या आणि घरगुती तसेच औद्योगिक कचऱ्याचा ताण लक्षात घेऊन हा प्रकल्प राबवण्याचे उद्दीष्ट आमदार मंदाताई यांनी ठरवले. त्यांनी दिनांक २५ जुलै २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्राद्वारे प्रस्ताव सादर केला. त्यानंतर मुख्यमंत्रीांनी ११ नोव्हेंबर २०२५ रोजी नगरविकास विभाग-२ चे अवर मुख्य सचिव डॉ. रवींद्र भराटे यांना प्रकल्पाबाबत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले.



यानुसार, डॉ. रवींद्र भराटे यांनी २५ नोव्हेंबर २०२५ रोजी नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांना सविस्तर प्रस्ताव आणि आवश्यक कागदपत्रांसह सादर करण्याचे आदेश दिले. सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर ५ डिसेंबर २०२५ रोजी सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP) तत्त्वावर हा एकात्मिक कचरा व्यवस्थापन प्रकल्प M/s R&B Greentech LLP यांना Letter of Award (LOA) देऊन मंजूर करण्यात आला. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी ३० डिसेंबर २०२५ रोजी LOA व प्रशासकीय मंजुरीचे अधिकृत दस्तऐवज अवर मुख्य सचिव डॉ. रवींद्र भराटे यांना सुपूर्त केले.

आमदार मंदाताई म्हात्रे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, हा प्रकल्प PPP तत्त्वावर सुरु होणार असून, अंदाजे १८०० ते २००० कोटी रुपयांचा खर्च येणार आहे. हा प्रकल्प नवी मुंबईकरांच्या आरोग्य आणि पर्यावरणासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

पत्रकार परिषदेत उपस्थित असलेल्या समाजसेवकांनी या प्रकल्पाचे स्वागत केले व आमदार मंदाताई म्हात्रे यांचे अभिनंदन केले. परिषदेत आर. बी. बर्वे, भरत गोलतकर, निखिल भंडारी, प्रवीणकुमार देशमुख, मधुकर कोळगे, विनायक तलाठी, श्रीकांत पत्की, माजी नगरसेवक निलेश म्हात्रे, विकास सोरटे, मंगेश चव्हाण, जयंत पाटील, मालती सोनी, संजय ओबेरॉय, आरती राऊळ, किरण वर्मा, शीतल जगदाळे तसेच अनेक पत्रकार उपस्थित होते.

सॅमसंग गॅलेक्सी A07 5G भारतात लॉंच

■ मुंबई (वाशी समाचार)

सॅमसंग इंडियाने तरुण पिढीच्या गरजांना लक्षात घेऊन गॅलेक्सी A07 5G स्मार्टफोन भारतात लाँच केला आहे. या फोनमध्ये ५० मेगापिक्सेल मुख्य कॅमेरा आणि ६०००mAh शक्तिशाली बॅटरी देण्यात आली असून, दिवसभर वापरासाठी तो उपयुक्त ठरतो. या स्मार्टफोनमध्ये ६.७ इंच FHD+ डिस्प्ले असून १२०Hz रिफ्रेश रेटमुळे व्हिडिओ पाहणे व वेब ब्राउझिंग अधिक स्मूथ होते. ८०० निट्स HBM ब्राइटनेसमुळे कडक उन्हातही स्क्रीन स्पष्ट दिसते. IP54 रेटिंग, २-स्टेप टेम्पर्ड ग्लास आणि GFRP बॅक पॅनलमुळे फोन अधिक टिकाऊ बनतो. लाइट व्हायोलेट, लाइट ग्रीन आणि ब्लॅक या तीन रंगांत उपलब्ध असलेला गॅलेक्सी A07 5G तरुणांसाठी परफेक्ट 'मोअर ऑसम' अनुभव देतो.



विश 2 केअर मल्टी स्पेशालिटी रुग्णालयात यशस्वी रि-अटॅचमेंट सर्जरी

■ उलवे (सुनील तावडे)

उलवे परिसरातील एका कन्स्ट्रक्शन साईटवर काम सुरू असताना भीषण अपघात घडला. काम करत असताना मजूर मोहन थापा यांचा पाय अचानक ग्राइंडर मशीनच्या संपर्कात आला आणि पाय पूर्णपणे कापला गेला. या घटनेमुळे कामाच्या ठिकाणी एकच गोंधळ उडाला. मोठ्या प्रमाणात रक्तस्राव होत असल्याने मजुराची प्रकृती अत्यंत गंभीर बनली होती.

अपघातानंतर स्थानिक नागरिक आणि सहकाऱ्यांनी कोणताही वेळ न दवडता प्रसंगावधान दाखवत जखमी मजुराला तातडीने उलवे येथील विश 2 केअर मल्टी स्पेशालिटी रुग्णालयात दाखल केले. रुग्णालयात पोहोचताच डॉक्टरांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून 'गोल्डन अवर'मध्ये उपचार सुरू केले.

रुग्णालयाचे सीईओ डॉ. शुभम पाठक, डॉ. महावीर आणि त्यांच्या अनुभवी वैद्यकीय पथकाने कोणताही विलंब न करता तातडीची शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. आवश्यक सर्व वैद्यकीय तपासण्या करून लगेच ऑपरेशन थिएटरमध्ये रुग्णाला नेण्यात आले.

सुमारे दोन तास चाललेल्या अत्यंत जटिल शस्त्रक्रियेत डॉक्टरांच्या पथकाने कापलेला पाय यशस्वीपणे पुन्हा जोडला. या शस्त्रक्रियेदरम्यान



अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे आणि तज्ज्ञ डॉक्टरांचा अनुभव मोलाचा ठरला. वेळेवर उपचार सुरू झाल्यामुळे रुग्णाचा जीव तर वाचलाच, शिवाय त्याचा पायही सुरक्षित राहिला.या संदर्भात बोलताना डॉ. महावीर यांनी सांगितले की, "अशा प्रकारच्या अपघातांमध्ये पहिला एक तास अत्यंत महत्त्वाचा असतो. योग्य वेळी रुग्णालयात पोहोचणे आणि तातडीने उपचार सुरू होणे हेच यशाचे मुख्य कारण ठरले. रुग्णालयातील आधुनिक सुविधा आणि अनुभवी वैद्यकीय टीममुळे ही शस्त्रक्रिया यशस्वी होऊ शकली." डॉ. महावीर यांनी पुढे सांगितले की, विश 2 केअर मल्टी स्पेशालिटी रुग्णालय हे उलवे परिसरातील असे एकमेव रुग्णालय आहे, जिथे सर्व प्रकारच्या वैद्यकीय सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध आहेत. त्यामुळे गंभीर अपघातग्रस्त रुग्णांना त्वरित आणि योग्य उपचार मिळणे शक्य होत आहे. स्थानिक नागरिकांची वेळेवर मदत आणि डॉक्टरांची तत्परता यामुळे एका गरीब मजुराचा जीव आणि त्याचा पाय दोन्ही वाचू शकले. ही घटना वेळेवर वैद्यकीय मदत, 'गोल्डन अवर'चे महत्त्व आणि आधुनिक मल्टी स्पेशालिटी रुग्णालयांची गरज अधोरेखित करणारी ठरली आहे.

नेशनल इंग्लिश हायस्कूलमध्ये रमाबाई आंबेडकरांना अभिवादन

■ मानखुर्द (वाशी समाचार)

मानखुर्द येथील नेशनल इंग्लिश हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेज येथे मातोश्री रमाबाई आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. स्वप्नील सोनवणे, सज्जाद मापारी सर, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अँड. सुनील भोवते सर, वसुंधरा शिर्के मॅडम तसेच शाळेचे डायरेक्टर योगेश तानाजी सानप उपस्थित होते.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मातोश्री रमाबाई आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आपल्या शब्दांत प्रकाश टाकला. इयत्ता ९ वीची विद्यार्थिनी चर्या इकरा सना उला चौधरी हिने रमाईंच्या संघर्षमय जीवनाविषयी माहिती देत "रमाईसारखी दुसरी रमाई होणे शक्य नाही" असे मोलाचे विचार मांडले.

विद्यार्थी दक्ष प्रकाश प्रजापती यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर भाष्य केले, तर अनुष्का अशोक शिंदे हिने शेन गोर्यातून निर्माण झालेल्या संघर्षाविषयी माहिती दिली. रजनी परुळे मॅडम यांनी चांगला समाज घडवण्यासाठी रमाबाई आंबेडकर यांच्या विचारांचे महत्त्व विशद केले. तसेच समाधान साबळे सर यांनी "जीवन म्हणजे संघर्ष" या विषयावर प्रभावी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे मुख्य आयोजक कमलेश वाघ (क्रीडा शिक्षक) होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वसुंधरा शिर्के मॅडम, सुनील चांदोरकर सर, पूजा भागवत मॅडम, शशी सागरे सर, सोनम कांबळे मॅडम, श्रुती गायकवाड मॅडम यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रजनी परुळे मॅडम यांनी केले तर आभार प्रदर्शन सोनम कांबळे मॅडम यांनी केले.



दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना माथाडी कामगारांची भावपूर्ण श्रद्धांजली

■ वाशी समाचा प्रतिनिधी

वाशी एपीएमसी मार्केट येथील कार्यालयात महाराष्ट्र राज्य माथाडी व जनरल कामगार सेनेच्या पदाधिकारी व माथाडी कामगारांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी अजितदादा पवार यांच्या सार्वजनिक जीवनातील प्रदीर्घ कार्याचा गौरव केला. ६६ वर्षे ६ महिने ६ दिवसांचे आयुष्य आणि सुमारे सहा वर्षे महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणून केलेले कार्य शब्दांत मांडणे अशक्य आहे, असे मत व्यक्त करण्यात आले. दादांनी खऱ्या अर्थाने महाराष्ट्राच्या विकासाला चालना दिली, गोरगरीब जनतेची अविरत सेवा केली आणि प्रशासनात शिस्त, निर्णयक्षमता व कार्यक्षमतेचा ठसा उमटवला, असेही यावेळी सांगण्यात आले. दादांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला असून, आजही दादा आपल्यात नाहीत हे मनाला मान्य होत नाही. मात्र घडलेले सत्य स्वीकारण्याशिवाय पर्याय नाही. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राचे अपरिमित नुकसान झाले आहे, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. शेवटी दोन मिनिटांचे मौन पाळून दिवंगत अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.



Accounting Firm requires Accounts/ Audit Executive staffs with 3-10 yrs exp in accounts, compliance (TDS, GST, IncomeTax, ROC), Payroll, Adv Excel. Send CV comnet. ventures@gmail.com. Freshers also welcome.



सानपाड्यात मिलेनियम टॉवर्स महिला मंडळाचा हळदीकुंकू कार्यक्रम उत्साहात संपन्न

■ सानपाडा (वाशी समाचार)

दि. 30 जानेवारी 2026 रोजी सानपाडा येथील मिलेनियम टॉवर्स महिला मंडळातर्फे भव्य हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला नवनिर्वाचित नगरसेविका शैला जाधव, सुप्रिया ठाकूर, तसेच नवनिर्वाचित नगरसेवक कुरकुटे यांच्या पत्नी नम्रता कुरकुटे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

सन 2023 मध्ये केवळ 40 महिलांसह सीमा बोराडे यांच्या अध्यक्षतेखाली नोंदणीकृत झालेले हे मंडळ काही काळ आलेल्या मरगळीनंतर पुन्हा जोमाने कार्यरत झाले आहे. जानेवारी 2026 पर्यंत मंडळाची सभासद संख्या 250 हून अधिक झाली असून, ही वाढ महिलांमधील एकोप्याचे आणि कार्याची दिशा दर्शवणारी आहे.

कार्यक्रमाची सुरुवात 'झाडे लावा, झाडे जगवा' या संदेशासह पाच महिलांच्या वृक्षारोपणाने झाली. त्यानंतर गणेशवंदना व स्वागतगीत सादर करण्यात आले. सर्वप्रथम उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, तसेच सोसायटीतील सह-रहिवासी अनंत रेवाळे आणि सुनीता दळवी यांच्या निधनाबद्दल श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यानंतर अध्यक्ष सीमा बोराडे यांनी मंडळाची स्थापना, संकल्पना व पुढील वाटचाल याबाबत सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन अलका भुजबळ यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी लवकरच पुन्हा एकत्र येण्याचे आश्वासन देत तिळगुळ लाडू व भेटवस्तू देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

धूळ प्रदूषण करणाऱ्या वाहनांवर पनवेल महापालिकेची कठोर कारवाई



■ पनवेल (वाशी समाचार)

पर्यावरण प्रदूषणाच्या तक्रारी पनवेल महानगरपालिका अत्यंत संवेदनशीलतेने हाताळत असून, दोषी आढळणाऱ्यांवर तात्काळ व कठोर कारवाई करण्यात येत आहे. सिध्दार्थ मार्केट, पनवेल येथील श्री समर्थ कृपा बिल्डर्स अॅन्ड डेव्हलपर्स यांच्या बांधकाम स्थळावरून मातीने भरलेले हायवा पंचरत्न ते उरण नाका मार्गावर ये-जा करताना रस्त्यावर मोठ्या प्रमाणात माती सांडत असल्याचे निदर्शनास आले. यामुळे धूळ प्रदूषण वाढून नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत होता.

महापालिकेस माहिती मिळताच घनकचरा व आरोग्य विभागाने तात्काळ कारवाई करत माती वाहून नेणारे हायवा बंद केले. तसेच रस्त्यावर पडलेली माती संबंधित विकासकाच्या कंत्राटदारामार्फत उचलून स्वच्छता करण्याचे निर्देश देण्यात आले.

वायू व ध्वनी प्रदूषण नियंत्रण नियमांनुसार बांधकाम साहित्य व रेडी मिक्स काँक्रीट वाहून नेणारी सर्व वाहने वरून व सर्व बाजूंनी पूर्णपणे झाकलेली असणे आवश्यक आहे. वाहनांतून कोणतीही गळती होऊ नये तसेच ओव्हरलोड होऊ नये, याची दक्षता घेण्याच्या स्पष्ट सूचना बांधकाम स्थळांना देण्यात आल्या आहेत. पनवेल महानगरपालिका हद्दीत स्वच्छता राखण्यासाठी घनकचरा व आरोग्य विभागामार्फत सातत्याने साफसफाई केली जाते. मात्र, कंत्राटदार किंवा बांधकाम विकासकांच्या हलगर्जीपणामुळे कचरा व धूळ वाढताना आढळल्यास कठोर कारवाईचे आदेश आयुक्त मंगेश चितळे यांनी दिले आहेत. नागरिकांचे आरोग्य, स्वच्छ हवा व पर्यावरण संरक्षणासाठी महापालिका कटिबद्ध असून, पुढेही तक्रारी आल्यास कारवाई सुरूच राहील, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

इंडिया आर्ट फेस्टिव्हलमध्ये अनुषा कृष्णा यांच्या कलाकृतींनी वेधले लक्ष

■ नवी मुंबई (वाशी समाचार)



नवी मुंबईतील उदयोन्मुख कलाकार व व्हिज्युअल स्टोरीटेलर अनुषा कृष्णा यांनी ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी दरम्यान वर्ली येथील नेहरू आर्ट सेंटर येथे पार पडलेल्या इंडिया आर्ट फेस्टिव्हलमध्ये आपल्या वैशिष्ट्यपूर्ण कलाकृती सादर केल्या. त्यांच्या चित्रांना कला रसिक, समीक्षक आणि पाहुण्यांकडून भरभरून दाद मिळाली असून, त्यांच्या सर्जनशील वाटचालीतील हा क्षण अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

लहानपणापासूनच कलेची ओढ असलेल्या अनुषा कृष्णा यांनी अलीकडच्या काही वर्षांत आपल्या सर्जनशील प्रवासाला अधिक ठोस आकार दिला आहे. चित्रकला, फोटोग्राफी आणि व्हिज्युअल स्टोरीटेलिंग या तिन्ही माध्यमांत त्या प्रभावीपणे कार्यरत आहेत. चित्रपट दिग्दर्शकाशी विवाहानंतर त्यांचे आयुष्य दृश्य माध्यमे आणि कथनकलेच्या अधिक जवळ गेले, ज्याचा सखोल प्रभाव त्यांच्या कलाभिव्यक्तीतून जाणवतो.

पाच वर्षांपूर्वी त्यांनी प्रसिद्ध कलाकार लिओ रॉय यांच्या मार्गदर्शनाखाली ललितकलेचे औपचारिक प्रशिक्षण सुरू केले. सध्या त्या प्रामुख्याने अॅक्रेलिक ऑन कॅनव्हास या माध्यमात काम करत असून, त्यांच्या शैलीत इम्प्रेशनिझम आणि क्युबिझमचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. त्याचबरोबर एक्स्प्रेसिव्ह आणि मिनिमल शैलींचा प्रयोग करत त्या स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करत आहेत. निसर्ग आणि भारतीय पुराणकथा हे त्यांच्या कलांचे मुख्य प्रेरणास्थान असून, हालचाल, स्थैर्य, समतोल आणि अंतर्मनातील भावनांचे सशक्त दर्शन त्यांच्या चित्रांतून घडते.

फेस्टिव्हलमध्ये प्रदर्शित झालेली 'Where Nature Breathes', 'Shiva – Ananda Tandava' आणि 'Airavata – Majesty in Stillness' ही चित्रे विशेष आकर्षण ठरली. या कलाकृतींमधून सूक्ष्म भावनांचा आणि दृश्य कथनाचा प्रभावी संगम पाहायला मिळाला. स्टुडिओतील सर्जनशील कामासोबतच अनुषा कृष्णा नवी मुंबईत कला कार्यशाळांचे आयोजनही करतात. या कार्यशाळांमध्ये त्या नवशिक्यांना अवघ्या तीन तासांत कॅनव्हासवर अॅक्रेलिक पेंटिंग साकारण्याचे मार्गदर्शन करून कला अधिक सहज आणि आत्मविश्वासाने अनुभवण्याची संधी देतात. अनुषा कृष्णा यांच्या कलाकृती, उपक्रम आणि कार्यशाळांविषयी अधिक माहिती इन्स्टाग्राम – @anusha_shuttercanvas येथे पाहता येईल. इंडिया आर्ट फेस्टिव्हलदरम्यान अनुषा कृष्णा यांच्या कलाकृतीला मोठा प्रतिसाद मिळाला असून, प्रसिद्ध आर्ट कलेक्टर कृष्णा नायर यांनी त्यांची कलाकृती खरेदी केली, ज्यामुळे त्यांच्या कलात्मक प्रवासातील हा अभिमानाचा क्षण ठरला.

नवी मुंबई मध्ये सेकंड हँड कार चे खात्रीशीर विक्रेते

ए एम मोटर्स

स्वस्त किमतीमध्ये सर्व प्रकारच्या A to Z कार ग्राहकांना उपलब्ध, सोबत इन्शुरन्स आणि इतर आवश्यक कागदपत्रांची चिंता सोडा



संपर्कासाठी : प्लॉट नंबर १६, कोपरी गाव, सेक्टर २६, वाशी. मो. : ९९८७५८३३३३

पत्रकारितेसोबत समाजकार्याचीही बांधिलकी ; मंगेश कांबळे यांचा प्रेरणादायी वाढदिवस

■ **ऐरोली (वाशी समाचार)**

दि. ५ फेब्रुवारी २०२६ रोजी मेट्रो साप्ताहिकाचे संपादक व मालक मंगेश कांबळे यांच्या वाढदिवसानिमित्त ऐरोली येथील प्रेमदान संस्थेमध्ये फळांचे वाटप करून सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण करण्यात आला.

वाढदिवस हा केवळ वैयक्तिक आनंद साजरा करण्याचा दिवस नसून समाजातील गरजू घटकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवण्याचा असावा, या उदात्त विचारातून हा समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आला.

प्रेमदान संस्थेमध्ये वास्तव्यास असलेल्या वृद्ध नागरिकांना ताज्या व पौष्टिक फळांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे संस्थेतील वातावरण आनंदी, उत्साहपूर्ण व भावनिक झाले. सामाजिक जाणीव ठेवून साजरा करण्यात आलेला हा वाढदिवस उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला.

या उपक्रमाचे प्रेमदान संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी मनःपूर्वक स्वागत करत मंगेश कांबळे यांच्या सामाजिक जाणिवेचे तसेच पत्रकारितेबरोबर समाजकार्याशी असलेल्या बांधिलकीचे विशेष कौतुक केले. यावेळी वाढदिवस समाजोपयोगी उपक्रमातून साजरा करण्याचा सकारात्मक संदेश देण्यात आला.

सामाजिक जबाबदारी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे उपस्थित नागरिक, संस्था प्रतिनिधी तसेच लाभार्थी वृद्धांनी समाधान व कृतज्ञता व्यक्त केली.





SIES नेरूळमध्ये माहितीपट व ॲनिमेशनचा सिने-उत्सव

■ **नेरूळ (वाशी समाचार)**

नेरूळ येथील SIES कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात (स्वायत्त) सुरू असलेल्या २३व्या फ्रेम्स फिल्म फेस्टिव्हलच्या दुसऱ्या दिवशी माहितीपट आणि ॲनिमेशन चित्रपटांनी रसिकांची मने जिंकली. 'किर्दार' या संकल्पनेवर आधारित या दिवशी सामाजिक वास्तव, मानवी अनुभव आणि सर्जनशील कल्पनाशक्ती यांचा सशक्त आविष्कार पाहायला मिळाला.

माहितीपट विभागात सामाजिक प्रश्न, वैयक्तिक संघर्ष आणि सत्याधारित कथा प्रभावीपणे मांडणाऱ्या चित्रपटांचे प्रदर्शन झाले. दिग्दर्शिका दिव्या उन्नी आणि माहितीपट दिग्दर्शक अनू मूथेडाथ यांनी या चित्रपटांचे परीक्षण करताना नैतिकता, जबाबदारी आणि प्रामाणिक कथनाचे महत्त्व अधोरेखित केले.

ॲनिमेशन विभागात कल्पनाशक्तीला नवे पंख मिळाले. दिग्दर्शक कबीर खुराना आणि OOZE स्टुडिओचे संस्थापक विश्वांग गोवरिकर यांच्या उपस्थितीत सर्जनशील, भावनिक आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम ॲनिमेटेड चित्रपट सादर झाले. प्रदर्शनानंतर झालेल्या प्रश्नोत्तर सत्रामुळे विद्यार्थी आणि तज्ज्ञांमध्ये उत्साही संवाद रंगला.

प्राचार्य डॉ. कोएल रॉय चौधरी, विभागप्रमुख मिथुन पिल्लई, अध्यक्ष अभिषेक दांडेकर आणि मल्टिमीडिया व मास कम्युनिकेशन विभागाच्या मार्गदर्शनाखाली हा महोत्सव यशस्वीपणे सुरू असून, युवा चित्रपटकर्त्यांना प्रेरणा देणारे आणि सामाजिक जाणीव जागवणारे व्यासपीठ म्हणून फ्रेम्स फिल्म फेस्टिव्हलने आपली ओळख अधिक भक्कम केली आहे.

ग्रामीण काव्यप्रतिभेला मानाचा मुजरा

श्रीराम घडे राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

■ **श्रीरामपूर, अहिल्या नगर (वाशी समाचार):**

अहिल्या नगर जिल्ह्यातील श्रीरामपूर येथे दोस्ती फाउंडेशनच्या वतीने आयोजित लोककलावंत पै. मजनूभाई शेख स्मृती गौरव पुरस्कार सोहळ्यात परभणी जिल्ह्यातील मौजे डुमनरवाडी येथील, सध्या तळेगाव दाभाडे (ता. मावळ, जि. पुणे) येथे वास्तव्यास असलेले ग्रामीण कवी मा. श्रीराम विध्यासागर घडे यांना राज्यस्तरीय 'युवा प्रेरणा पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.

मराठी साहित्य क्षेत्रात सातत्यपूर्ण लेखन, सामाजिक विषयांवरील परखड मांडणी तसेच युवा कविंना मार्गदर्शन करणाऱ्या साहित्यसेवेबद्दल कवी श्रीराम घडे यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. हा पुरस्कार दि. ३१ जानेवारी रोजी श्रीरामपूर येथे मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडलेल्या भव्य सोहळ्यात आरटीओ अधिकारी राणीताई सोनवणे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. याच सोहळ्यात सर्व मान्यवर व चित्रपट कलाकारांच्या उपस्थितीत 'शापित ग्रंथ' या लघुचित्रपटाचे प्रमोशनही करण्यात आले. या चित्रपटाचे दिग्दर्शक-निर्माते प्रमोद सूर्यवंशी, आमदाराच्या भूमिकेत रज्जाकभाई शेख, आमदाराच्या पत्नीच्या भूमिकेत स्मिता देशमुख, हवालदाराच्या भूमिकेत वंदना नागणे तसेच कलाकार श्रीराम घडे उपस्थित होते. या लघुचित्रपटात श्रीराम घडे यांनी हवालदार शिंदे यांची भूमिका साकारली आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. महावीरसिंग चौहाण होते. उद्घाटक म्हणून राणीताई सोनवणे यांच्यासह संदीप कुमार बोरकर, करण नवले, नानासाहेब डोंगरे, सुनीता वाळुंज, मोहिनीराज होन, प्रमोद सूर्यवंशी (शापित ग्रंथ चित्रपट दिग्दर्शक-निर्माते) आणि श्वेता सावंत हे मान्यवर उपस्थित होते.

या सन्मानाबद्दल साहित्यिक, सामाजिक तसेच फिल्म क्षेत्रातून ग्रामीण कवी श्रीराम घडे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



T20 वर्ल्ड कप : U19 वर्ल्ड कपमध्ये नवी मुंबईचा अभिग्यन कुंडू!



■ **कोपरखैरणे (वाशी समाचार)**

कोपरखैरणे (अश्विनी तावडे) : भारताच्या U19 क्रिकेट संघाचा चमकता विकेटकीपर अभिग्यन कुंडू आता नुसता संघाचा नाही, तर नवी मुंबईचा अभिमान बनला आहे! नुकत्याच संपलेल्या वर्ल्ड कपमध्ये त्याच्या जबरदस्त कामगिरीमुळे सर्वांची नजर त्याच्यावर लागली.

लहान वयातच स्थानिक क्रिकेट अकादमीपासून प्रशिक्षण घेतलेला अभिग्यन आता भविष्याच्या मोठ्या रणभूमीवर भारताची मान उंचावण्यासाठी सज्ज आहे. नवी मुंबईकर त्याच्या यशावर गर्व करत आहेत आणि त्याचे पुढील आंतरराष्ट्रीय पदार्पण पाहण्यासाठी उत्सुक आहेत. अभिग्यन म्हणतो, "नवी मुंबई आणि कुटुंबाच्या पाठिंब्याशिवाय हे शक्य झाले नसते. प्रत्येक विजय त्यांच्या नावाचा आहे."

स्वच्छतेच्या शिखराकडे नवी मुंबईची वाटचाल

नवी मुंबईच्या स्वच्छतेसाठी प्रशासनाचा 'झिरो टॉलरन्स' दृष्टिकोन



■ नवी मुंबई (वाशी समाचार)

नवी मुंबई महानगरपालिका ही यंदा नियमित क्रमवारीपेक्षा उच्चतम असलेल्या 'सुपर स्वच्छ लीग' या विशेष श्रेणीत समाविष्ट असून, 'स्वच्छ सर्वेक्षण 2025–26' ला सामोरे जाताना सर्व संबंधित घटकांनी आपले संपूर्ण योगदान द्यावे, असे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी दिले आहेत.

या अनुषंगाने अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी महापालिका क्षेत्रातील सर्व साफसफाई कंत्राटदारांची बैठक घेऊन स्वच्छ सर्वेक्षणाच्या टूलकिटमधील बाबींची सविस्तर माहिती दिली. प्रत्यक्ष क्षेत्रीय पातळीवर स्वच्छताकर्मींमार्फत काम केले जात असल्याने कंत्राटदारांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे आणि मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे उपस्थित होते.

यावर्षीच्या स्वच्छ सर्वेक्षणात प्रत्यक्ष दिसणारी स्वच्छता आणि नागरिकांचा प्रतिसाद यांना विशेष महत्त्व देण्यात येणार आहे. त्यामुळे घनकचरा व्यवस्थापनाशी संबंधित सर्व बाबी अधिक गांभीर्याने व प्रभावीपणे राबवण्याचे निर्देश अतिरिक्त आयुक्तांनी दिले. गावठाणे तसेच झोपडपट्टी भागातील अंतर्गत स्वच्छतेकडे विशेष लक्ष देण्याचे सूचित करत, त्या भागातील नागरिकांना कचरा वर्गीकरण व योग्य विल्हेवाटीबाबत सातत्याने प्रबोधन करण्यावर भर देण्याचे त्यांनी सांगितले.

स्वच्छताकर्मींना आवश्यक सुरक्षा साधने उपलब्ध करून देण्यात आली असतानाही त्यांचा वापर होत नसल्याचे निदर्शनास येत असल्याने, त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने ही साधने वापरणे अत्यावश्यक असल्याचे पटवून देऊन त्याची अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या. स्वच्छताकर्मींकरिता कार्यान्वित करण्यात आलेल्या कामगार वैद्यकीय सहाय्यता कक्षाची माहिती सर्व कामगारांपर्यंत पोहोचवावी, तसेच आयुष्मान भारत कार्ड नसल्यास तातडीने काढून देण्याची कार्यवाही करावी, अशाही सूचना कंत्राटदारांना देण्यात आल्या. याशिवाय प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना आणि प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना यांचे लाभ उपलब्ध करून देण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन करण्यात आले. स्वच्छताकर्मींकरिता उभारण्यात आलेल्या हजेरी शेडमध्ये अधिक सुविधा उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया सुरू असून, यासंदर्भातील सूचना घनकचरा व्यवस्थापन विभागाकडे कळवाव्यात, असेही सांगण्यात आले. ज्या वाणिज्य भागांमध्ये दिवसातून दोन वेळा सफाई होते, त्या भागांतील स्वच्छतेकडे विशेष लक्ष देण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच स्वच्छता अधिकारी व निरीक्षकांनी कंत्राटदारांच्या नियमित बैठका घेऊन त्यांच्याशी संवाद व समन्वय राखावा, असे स्पष्ट करण्यात आले. यावेळी कंत्राटदारांना काम करताना येणाऱ्या अडचणी जाणून घेऊन त्यावर चर्चा करण्यात आली. दररोज शहर स्वच्छ ठेवणाऱ्या स्वच्छताकर्मींचे योगदान अत्यंत मोलाचे असून, त्यांच्या माध्यमातून काम करणाऱ्या सर्व कंत्राटदारांच्या सहकार्यामुळेच नवी मुंबईचे स्वच्छता मानांकन उंचावणे शक्य आहे. 'स्वच्छ सर्वेक्षण 2025–26' मध्ये उत्कृष्ट कामगिरीसाठी सर्वांनी एकसंघपणे अधिक प्रभावीपणे काम करूया, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी केले.

इतिहास घडणार! नितीन पाटील यांच्या रूपाने पनवेलला पहिला आगरी समाजाचा महापौर

■ पनवेल (वाशी समाचार)

पनवेल महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर पदाकरिता होणाऱ्या निवडणुकीसाठी भाजप महायुतीकडून दि. ६ फेब्रुवारी रोजी अधिकृतपणे उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. महापौर पदासाठी नितीन जयराम पाटील तर उपमहापौर पदासाठी प्रमिला रविनाथ पाटील यांनी पनवेल महानगरपालिका कार्यालयात नगरसचिव नानासाहेब कामठे यांच्याकडे आपले उमेदवारी अर्ज सादर केले.

नितीन पाटील यांच्या निवडीमुळे पनवेलला पहिल्यांदाच आगरी समाजाचा महापौर लाभणार असून, ही घटना समस्त आगरी समाजासह पनवेल शहरासाठी ऐतिहासिक ठरणारी आहे. त्यांच्या निवडीमुळे सामाजिक समतेचा आणि सर्वसमावेशक राजकारणाचा नवा अध्याय सुरू होणार असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

पनवेल महानगरपालिकेची २०२६ सालची सार्वत्रिक निवडणूक भाजप महायुतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, माजी खासदार व लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वाखाली लढवली होती. या निवडणुकीत भाजपने ५५ जागा, शिवसेनेने २ जागा आणि राष्ट्रवादी काँग्रेसने २ जागांवर विजय मिळवत एकूण ५९ जागांसह पनवेल महानगरपालिकेवर पुन्हा एकदा भाजप महायुतीची भक्कम सत्ता प्रस्थापित केली आहे.

महापौर व उपमहापौर पदासाठी दिनांक १० फेब्रुवारी रोजी निवडणूक होणार असून, त्याअनुषंगाने दि. ६ फेब्रुवारी रोजी भाजप महायुतीकडून उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. महापौर व उपमहापौर पदासाठी नावे प्रदेश नेतृत्वाकडे सुचवण्यात आली होती. प्रदेश कार्यकारिणीच्या मान्यतेनंतर ही निवड करण्यात आली असून, सव्वा वर्षांचा फॉर्म्युला निश्चित करण्यात आला आहे.

अर्ज दाखल करताना भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शिवदास कांबळे, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, शिवसेनेचे महानगरप्रमुख प्रथमेश सोमण यांच्यासह महायुतीतील नगरसेवक, नगरसेविका व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे यांच्यासह महायुतीतील सर्व नेत्यांनी नितीन पाटील व प्रमिला पाटील यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

"नितीन पाटील व प्रमिला पाटील यांना समाजकार्याचा प्रदीर्घ अनुभव आहे. त्याचा फायदा पनवेल महानगरपालिकेच्या विकासासाठी निश्चितच होईल. जनतेचे प्रश्न सोडवतानाच सर्वांगीण विकास साधण्याची त्यांची भूमिका राहील. प्रदेश कार्यकारिणीने त्यांच्या निवडीबाबत योग्य निर्णय घेतला आहे. सर्व घटकांना सोबत घेऊन चालण्याचे आमचे धोरण असल्याने भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस व आरपीआय महायुतीमध्ये उत्कृष्ट समन्वय आहे." — परेश ठाकूर, माजी सभागृहनेते, पनवेल महानगरपालिका



MAHARASHTRA AUTO GARAGE
All Types of Mechanical, Denting, Painting, Polishing
CHECKING FAULTS USING SCANNER MACHINE
munna
7710841111
Plot No. 19, Sector 1, Ghansoli
Near Sai Shradha Lodge

A2Z
CAR ACCESSORIES
HOUSE OF LATEST CAR ACCESSORIES & MUSIC SYSTEM
Shop No.9, Twinsland Aparment
Opp. D.Y. Patil College, Sector 1
Nerul, Navi Mumbai 400706
TAIYAB QURESHI : 9022264447

A M MOTOR
Multi Brand Car Workshop
●Road Assistance 24x7
●All Mechanical & Electrical Work
●Denting-Painting
●A/C Work
●Car Polish & Interior Cleaning
●Insurance Cashless Facility
Painting Booth Available
Shop NO. 1&2, Plot No. 37, Vijay Vilas Complex
Behind Croma Showroom, Palm Beach Road
Near Satra Plaza, Sector 19C, Vashi
9987583333. Email: amcaraccessories@gmail.com

This newspaper is published by Sunil D. Tawade from B10/15/2:3, Omkar CHS, Sector 15, Vashi, Navi Mumbai 400705, edited by Sunil D. Tawade and printed by Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd., Plot No. W-230, TTC Industrial Area, Thane-Belapur Road, Khairne MIDC, Navi Mumbai 400710. Editor: Sunil D. Tawade.